३२१५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१/२६०५१११०　　ई-मेल आयडी :-sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/मार्ग. सुचना/अभि.धा.३३ /३९६५/सन २०१७

दि : ०६/०६/२०१७

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशीक सहसंचालक (साखर) (सर्व)
३. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)
४. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहनिबंधक सहकारी संस्था (म्हाडा)
५. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशीक उपसंचालक (वस्त्रोदयोग) (सर्व)
६. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
७. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक (एस आर ए)(सर्व)
८. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहा. निबंधक (पदुम) (सर्व)
९. तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय:- सहकारी संस्थाच्या निवडणूकादरम्यान निर्वाचन अधिकारी यांचे होणा-या नियतकालीक बदल्या / सेवानिवृत्ती / राजीनामा/ बडतर्फी /मृत्यू / गंभीर आजारपण/ वैयक्तीक स्वरूपाच्या गंभीर अडचणी इ.बाबत अनुसरावयाची कार्यपध्दती**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) नुसार राज्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत करण्यात आले असून प्राधिकरणास उक्त नमूद कलमान्वये राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांच्या निवडणूका, नैमित्तिक रिक्त जागा व पदाधिकारी इ. च्या निवडणूका घेण्याचे अधिकार प्राप्त आहेत. प्राधीकरणाच्या धोरणानुसार सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाची निवडणूक ही वेळेवर, अचूक मतदार यादीवर आधारीत, मोकळया वातावरणात तसेच पारदर्शक पध्दतीने नियमानुसार घेण्याची कार्यवाही सुरू आहे. प्राधिकरणाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नुसार संस्थांच्या निवडणूका घेण्याचे कामकाज सुरु केलेले आहे.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १२ अन्वये प्राधीकरणाकडून निर्वाचन अधिकारी नियुक्तीस मान्यता दिल्यानंतर निवडणूकीविषयक कामकाजास सुरूवात करण्यात येते. काही प्रकरणात सुरू असणारा निवडणूक कार्यक्रम महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार विहीत कालमर्यादेप्रमाणे अंतिम होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने निर्वाचन अधिकारी यांची नियतकालीक बदली, अन्य विभागात विभाग बदली (वर्ग – ३ चे बाबतीत), सेवानिवृत्ती, राजीनामा, बडतर्फी, मृत्यू, गंभीर आजारपण, वैयक्तीक स्वरूपाच्या गंभीर अडचणी इ मुळे निवडणूक कार्यक्रम मंजूर कालमर्यादेत पूर्ण करण्यास अडचणी येत असल्याचे दिसून आलेले आहे. याबाबत **अ, ब व क वर्गीकरणातील सहकारी संस्थांचे बाबतीत**

प्राधीकरणाचे स्तरावरून सहकारी संस्थेचे निवडणूकीचे कामकाजामध्ये अडथळे न येता सदरचे कामकाज विहीत पध्दतीने व कालमर्यादेत पूर्ण करण्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. सहकारी संस्थेचे निवडणूकीकरीता निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीची नियतकालीक बदली झाल्यास अथवा नियुक्ती प्राधीका-यांचे नियंत्रणाखालील अन्य विभागात विभाग बदली झाल्यास (वर्ग – ३ चे बाबतीत) अशा प्रकरणामध्ये शक्यतो महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया सुरू असल्यास अशी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संबंधीतांना कार्यमुक्त करू नये. जेणेकरून प्रगतीपथावरील निवडणूक विषयक कामकाजामध्ये अडथळे निर्माण न होता विहीत मुदतीत व मंजूर निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया पूर्ण करता येईल.

२. सहकारी संस्थेचे निवडणूकीकरीता निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीची सेवानिवृत्ती, राजीनामा, बडतर्फी, मृत्यू, गंभीर आजारपण किंवा वैयक्तीक स्वरूपाच्या गंभीर अडचणी इ मुळे महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर निवडणूक कार्यक्रमा प्रमाणे निवडणूक प्रक्रिया सुरू असल्यास अशी प्रक्रिया पूर्ण करण्याकरीता तात्काळ जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सदरची बाब रा स नि प्रा यांचे निदर्शनास आणून दयावी. तसेच निवडणूक कार्यक्रमात अडथळा येणार नाही याची दक्षता घेऊन अन्य निर्वाचन अधिका-यांची सदर निवडणूकीकरीता नेमणूक करण्याकरीता रा स नि प्रा यांचे कडे प्रस्ताव पाठवून व वैयक्तीक पाठपुरावा करून निर्वाचन अधिकारी नियुक्तीचे महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १२ अन्वये सुधारीत आदेश प्राप्त करून घेऊन संबंधीत सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रिया सुरू ठेवावी.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबविली जात असताना नव्याने निर्वाचन अधिकारी नेमण्याची आवश्यकता असलेल्या प्रकरणामध्ये संबंधीत सहकारी संस्थेचे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी किंवा तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी याबाबत रा स नि प्रा कडे प्रस्ताव सादर करून अन्य निर्वाचन अधिकारी नियुक्तीचे आदेश मिळविण्याकरीता वैयक्तीक स्वरूपात पाठपुरावा करणे आवश्यक आहे. तसेच पूर्वीचे निर्वाचन अधिकारी यांचेकडील निवडणूक विषयक कागदपत्रे, निवडणूक निधी तसेच अन्य निवडणूकविषयक साहित्य नव्याने नियुक्त करण्यात येणा-या निर्वाचन अधिका-यांस सोपविणेची जबाबदारी पार पाडावयाची आहे.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तथापी अश्या निवडणूकीबाबतची आवश्यक माहिती व निधीच्या खर्चाचे प्रस्ताव आवश्यकतेप्रमाणे जि स नि अ / ता स नि अ/ प्र स नि अ किंवा रा स नि प्रा यांना सादर केलेले नसतील तर अश्या प्रकरणात संबंधीत निर्वाचन अधिका-याची नियतकालीक बदली झाल्यास अथवा नियुक्ती प्राधीका-यांचे नियंत्रणाखालील अन्य विभागात विभाग बदली झाल्यास (वर्ग – ३ चे बाबतीत) त्यांचेकडून सदर बाबींची पूर्तता करूनच त्यांना कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चा नियम १८ अन्वये मंजूर कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तथापी अश्या निवडणूक खर्च मंजूरीची कार्यवाही पूर्ण होऊनही अतिरिक्त / शिल्लक निवडणूक निधी संबंधीत सहकारी संस्थेस अदा केल्याबाबतची कार्यवाही पूर्ण करून सदर निधी प्राप्त झाल्याबाबत संबंधीत सहकारी संस्थेची पोहोच जि स नि अ / ता स नि अ/ प्र स नि अ किंवा रा स नि प्रा यांना सादर केलेले नसतील तर अश्या प्रकरणात संबंधीत निर्वाचन अधिका-याची नियतकालीक बदली झाल्यास अथवा नियुक्ती प्राधीका-यांचे नियंत्रणाखालील अन्य विभागात विभाग बदली झाल्यास (वर्ग – ३ चे बाबतीत) त्यांचेकडून सदर बाबींची पूर्तता करूनच त्यांना कार्यमुक्त करण्याची कार्यवाही करावी.

३६१५

६. निर्वाचन अधिकारी म्हणून कामकाज केल्यानंतर नियुक्ती प्राधीका-यांचे नियंत्रणाखालील अन्य विभागात विभाग बदली झाल्यास (वर्ग – ३ चे बाबतीत) त्यांचेकडून मागील निवडणूकीचे खर्चाची माहिती, खर्च मंजूरीचे प्रस्ताव, निवडणूकविषयक अहवाल/माहिती/कागदपत्रे, सादर केली जात नसल्याचे प्राधीकरणाचे निदर्शनास आलेले आहे. तसेच निवडणूक खर्चास मंजूरी दिल्यानंतर संबंधीत सहकारी संस्थेस अदा करावयाची निवडणूक निधीची अतिरिक्त रक्कम अदा केली नसल्याचे दिसून आलेले आहे.

७. सदर बाबी या निवडणूकविषयक अपराध या व्याख्येमध्ये येत असून संबंधीतांविरूध्द तात्काळ निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्तीचा प्रस्ताव पाठविणा-या जि स नि अ/ ता स नि अ/प्र स नि अ यांनी नवीन विभागाचे जि स नि अ तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचे कडे प्रस्ताव पाठवून सदर बाबींची एक महिन्यात पूर्तता करण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करण्याची विनंती करावी.

८. सदर कालावधीत संबंधीत कर्मचा-याने (निर्वाचन अधिका-याने) त्याचेकडील प्रलंबीत बाबींची पूर्तता न केल्यास नियुक्ती प्राधीकारी म्हणून संबंधीत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी जबाबदार दोषी कर्मचा-याविरूध्द तात्काळ उचित शिस्तभंगविषयक कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल १५ दिवसात प्राधीकरणास व निर्वाचन अधिकारी म्हणून नियुक्तीचा प्रस्ताव पाठविणा-या कार्यालयास पाठविण्याची वैयक्तीक दक्षता घ्यावी.

उक्त सूचनांचे सर्व संबंधीतांनी गांभीर्यपूर्वक पालन करण्याची दक्षता घ्यावी.

**मा आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण यांचे मान्यतेने**

०६/०६/१७

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव–**

१. मा आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरण, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे स्वीय सहायक कक्ष
२. मा सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे
३. मा साखर आयुक्त महाराष्ट्र राज्य पुणे
४. मा संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोदयोग विभाग, महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. मा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे

**प्रत माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना –**

१. सह सहकारी निवडणूक आयुक्त (सर्व)
२. उप सहकारी निवडणूक आयुक्त (सर्व)
३. सहायक सहकारी निवडणूक आयुक्त (सर्व)
४. कक्ष अधिकारी, (सर्व)